महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांकः बदली-२०१८/प्र.क्र.१७९/१४-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १ ऑगस्ट, २०१९

वाचा:- १) समक्रमांकाचे दिनांक १४ जून, २०१९ चे शासन आदेश.

शासन आदेश

संदर्भाधिन आदेशान्वये श्री.गौ.कि.भोसले, सहायक कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग त्याचप्रमाणे श्री.यो.ल.गायकवाड, लिपिक-टंकलेखक, महसूल व वन विभाग यांची विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ च्या कामकाजाकरीता करण्यात आलेली आंतरविभागीय बदली प्रशासकीय कारणांस्तव या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) व ४ (५) अनुसार खाली नमूद केलेल्या मंत्रालयीन विभागातील सहायक कक्ष अधिकारी / लिपिक-टंकलेखकांची विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ च्या कामकाजाकरीता आंतरविभागीय बदली करण्यात येत असून, त्यांच्या नावासमोरील स्तंभ-६ मध्ये दर्शविलेल्या विभागात त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

अ.क्र.	श्री / श्रीमती	सहायक कक्ष अधिकारी / लिपिक-टंकलेखकाचे नांव	पदनाम	सध्याचा विभाग	बदलीनंतर पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५	६
१	श्री	गि.गो.नारलावार	सहायक कक्ष अधिकारी	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	सामान्य प्रशासन विभाग/निवडणूक शाखा (कार्यासन-३३)
२	श्री	ग.र.राणे	लिपिक-टंकलेखक	नियोजन विभाग	सामान्य प्रशासन विभाग/निवडणूक शाखा (कार्यासन-३३)

२. उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावासमोरील रकाना क्रमांक ५ येथील विभागातून रकाना क्रमांक ६ येथील बदली झालेल्या विभागात रुजू होण्यासाठी दिनांक ०१-०८-२०१९ (म.नं.) पासून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. उपरोक्त कर्मचाऱ्यांनी इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता त्यांच्या नावासमोरील रकाना क्रमांक ६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागात तत्काळ रुजू व्हावे.

३.	उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन ३३ येथील सहायक कक्ष अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील अधिसंख्य पदावर सन २०१९ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कामकाज पूर्ण होईतोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर कामकाजाअंती उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा संबंधित विभागाकडे आपोआप पून:श्च वर्ग होतील.

४.	सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८०११५१४२६५७०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ad a8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f 73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.01 15:20:45 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित सहायक कक्ष अधिकारी / लिपिक-टंकलेखक (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग/महसूल व वन विभाग/ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग/नियोजन विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (संबंधित मंत्रालयीन विभागांमार्फत)
३ प्रधान सचिव व मुख्य निवडणुक अधिकारी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. सह/उप सचिव (आस्थापना), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग/महसूल व वन विभाग/ कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग/नियोजन विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५ उप सचिव/अवर सचिव (निवडणूक शाखा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. निवड नस्ती/संग्रहार्थ (कार्यासन १४-अ)